**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume III*

**11**

# अहिल्याबाई होळकर समकालीन इतिहासकारांच्या दृष्टिकोनातून - एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा.डॉ. संजय बाबुराव शिंगाणे**
इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगाव जि. जळगाव

---

**प्रस्तावना –**

इतिहासाच्या कालपटावर स्त्री व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी सांस्कृतिक पुनरुत्थानाची पायाभरणी केली.एका राज्याच्या प्रमुख म्हणुन त्यांनी वेगवेगळी लोक कल्याणकारी कार्ये कशा प्रकारे केली व त्यांच्या जिवनाच्या केवळ एका अंगाचा अभ्यास न करता त्या प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीने व त्यांनी केलेल्या कार्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास करण्यासाठी व समाजासमोर इतरही विविध स्वरूपाच्या कार्याची माहिती आणण्यासाठी हा विषय शोधनिबंधासाठी निवडला आहे.त्यामुळे त्यांच्या कार्याची महत्वाची व उत्कृष्ठ राज्यकर्तीची भुमिका समाजासमोर येईल.त्यांच्या व्यापक कार्यातील काही अंश त्रिशताब्दी जन्मोत्सवाच्या निमित्ताने संक्षिप्त स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

**मुख्य शब्द-** अहिल्याबाई होळकर,सांस्कृतिक,इतिहासकार,

**उद्दिष्ट्ये-**

१. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या समकालीन परिस्थितीचा अभ्यास करणे.
२. एक आदर्श राज्यकर्ती म्हणून त्यांच्या लोककल्याण कार्याचा आढावा घेणे.

**विषय प्रवेश –**

गतकाळात पाश्चात्यांनी केलेल्या अनेक आक्रमणानंतर विशेषतःमध्ययुगातील विध्वंसानंतरही भारतीय संस्कृती अभेद्य आहे, कारण आपला इतिहास, आपली महान संस्कृती आणि आपला तेजस्वी वारसा जोपासण्याचे कार्य अनेक विभूतींनी केले आहे. छत्रपती शिवाजीराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय संस्कृती संवर्धनाची मुहूर्तमेढ रोवली.स्वराज्य निर्मितीच्या कार्यात सातत्याने छ.शिवाजी राजांनी पाश्चात्यांशी संघर्ष करून सर्वसामान्य रयतेच्या,प्रजेच्या मनात स्वावलंबन व स्वाभिमान निर्माण केला आणि याच भारतीय परंपरेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले कार्य अलौकिक आणि अद्वितीय असे आहे. अहिल्यादेवी यांच्या विषयी केवळ भारतातीलच नव्हे तर पाश्चात्य विचारवंतानी दिलेली विशेषणे आणि उपमा त्यांच्या अद्भुत कार्याचे महत्त्व अधोरेखित करतात, विशेषतःपुण्यश्लोक,तेजस्विनी,संस्कृती संवर्धक, तपस्विनी, प्रजावत्सल,स्वयंसिद्धा,कर्मयोगिनी,विजयशालिनी, भागीरथी,कर्तृत्वशालिनी, दार्शनिक महाराणी,लोकमाता अशा बहुविध उपमा देऊन अहिल्यादेवी यांना गौरविण्यात आले आहे आणि याच संकल्पनेवर त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्यकर्तृत्वाचा वेध शोधनिबंधात घेण्यात आला आहे.त्यांचे तपस्वी व्यक्तिमत्त्व आपल्याला समर्पित आणि हिंदुस्थानच्या सांस्कृतिक पुनर्निर्माणाचे कार्य करण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

व्यक्तीच्या मृत्यूनंतर जे लिहिले जाते त्यात अतिशयोक्ति येण्याचा फारमोठा संभव असतो. परंतु समकालीनांकडून जे लिहिले, सांगितले जाते त्यात वस्तूनिष्ठता असते. माणूस जिवंत असतानाही त्याच्याविषयी गौरवोद्‌गार निघणे ही मोष्ट पूर्वीच्या काळी कमी प्रमाणात होत होती. पूर्वीच्या काळी जिवंतपणी स्तुती क्वचित एखाद्यालाच मिळत असे आणि त्यासाठी प्रचंड कर्तृत्व असावे लागत होते.

अहिल्यादेवींना स्तुती विषसमान वाटत असे. एका कवीच्या वह्या त्यांनी नर्मदेत बुडविल्या होत्या. अशा राज्यकर्ती स्त्रीविषयी जेव्हा स्कॉटलंडमधील कवयित्री जोना बेली लिहितात तेव्हा आश्चर्य वाटते. सुप्रसिद्ध इतिहासकार आणि त्याकाळचे राजकीय दूत सर जॉन मालकम लिहितात तेव्हा आज आपण चकित होतो. मोरोपंत, अनंतफंदी यांनी तर लिहिले आहेच पण हे परदेशी लेखक परक्या भाषेत अहिल्यादेवींचे गुण गातांना दिसतात. स्कॉटलंडमध्ये कवयित्री जोना बेली यांनी अहिल्यादेवींवर एक दीर्घ काव्य लिहिले आहे. त्यात पूण्यश्लोक अहिल्याबाईंच्या अंगभूत गुणांचे समर्पक असे वर्णन केलेले दिसते.

For thirty years her reign of peace,

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume III

The land in blessings did increase!
And she was blessed by every thongue...
By stern and gentle, old and young!
श्री हिरालाल शर्मा यांच्या पुस्तकात याचे मराठीत भाषांतर केलेलं आहे. ते पुढीलप्रमाणे-
तीस वरुषे प्रशांत सत्ता त्यांनी गाजविली ।
वैभव, धन, ऐश्वर्य संपदा, सदैव वाढविली ।।
सुष्ट, दुष्ट अन् सान थोर त्या साऱ्या पौरजनांनी ।
मुक्त रखाने सती अहिल्या सदैव वानियली ।।

अहिल्याबाई होळकर यांनी स्वत:च्या क्षमतेनुसार एक नेता म्हणून स्वत:ला स्थापित करण्याचा प्रयत्न केला आणि भारताच्या अध्यात्मिक कार्यात योगदान दिले. प्रामाणिकपणाला प्रोत्साहन दिले आणि प्रशासकीय साधेपणा आणि राजकीय निष्पक्षता आणली.खंडेरावांच्या निधनानंतर त्यांनी पितृसत्तेच्या बेड्यांचा त्याग केला. पितृसत्तेच्या बेड्या तोडून त्यांनी पतीच्या मृत्यूनंतर सम्राटाची भूमिका स्वीकारली. 30 वर्षांच्या शांतता आणि आर्थिक स्थैर्यामध्ये त्याचे असामान्य नेतृत्व कौशल्य त्यांच्या राज्यकारभारात अनुभवायला मिळाले.

तसेच सुप्रसिद्ध इतिहासकार आणि त्या काळचे पोलिटिकल एजंट सर जॉन माल्कम लिहितात, ``अहिल्याबाई ही एक असामान्य स्त्री आहे. दुराभिमानाचा त्यांना स्पर्शही नाही, धर्मपरायणही असलेली ही स्त्री कमालीची सहनशील आहे. त्यांचे मन रुढीप्रिय असले तरी, रुढींचा उपयोग जनकल्याणासाठी करून घ्यायची त्यांची हातोटी विलक्षण आहे. प्रत्येक क्षणाला सद्विवेकबुद्धीने कर्तव्य करणारे उच्च प्रतीचे जीवन आहे. त्यांच्या चारित्र्याचा विकास केवळ अद्वितीय असाच आहे``.

समकालीन व्हाईसरॉय लॉर्ड एलनबरो यांनी एका पत्रात म्हटले आहे की, "अहिल्याबाई एक सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी आणि आदर्श राज्यकर्त्या आहेत. अन्य धर्मियांचा द्वेष त्यांच्या ध्यानीमनीसुद्धा नाही. एका महाराज्याच्या स्वामिनी असूनही त्या तपस्विनीप्रमाणे अगदी साध्या राहतात. शुभ्रवस्त्राखेरीज अन्य वस्त्रे त्यांना त्याज्य आहेत."

शाहीर प्रभाकर आपल्या अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा उल्लेख पुढील कवनात मांडतांना ते असे म्हणतात,
सति धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई ।
गेली कीर्ति करुनिया भूमंडळाचे ठाई ।।
महाराज अहिल्याबाई पुण्यप्राणी ।
संपूर्ण स्त्रियांमधि श्रेष्ठ रत्नखाणी ।।

या कलयुगातील अहिल्याबाईंची राजवट हे सर्वसमावेशक धोरणनिर्मितीचे उदाहरण आहे. त्यांनी आपल्या राज्याच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या उन्नतीसाठी विविध स्तरांवर काम केले. त्यांचा वारसा केवळ राज्याच्या प्रशासकीय कौशल्यांसाठीच नव्हे तर होळकर घराण्याच्या भावी पिढ्यांसाठी प्रभावी मार्ग मोकळा करण्यासाठी देखील लक्षात ठेवला जातो

कवि मोरोपंतांनी अहिल्याबाई होळकर यांच्या धर्म कार्याविषयी ज्या आर्या लिहिल्या त्याचा अर्थ पुढे देत आहे.
१) हे देवी अहिल्ये तू हरिहराची परमभक्त आहेस,तुझ्या भक्तिमुळे तू पृथ्वीचे श्रेष्ठ भूषण झाली आहेस.
सूर्य तुझी प्रशंसा करतो.
२) तुम्ही तिन्ही लोकात धन्य झालात. कलियुगात तुझ्यासारखी न्यायी आणि धर्मपरायण दुसरी झाली नाही.
३) धर्मकार्य करण्यासाठी तुझा जन्म झाला आहे. तू सीतेचा अवतार आहेस. तुला जितकी किर्ती लाभली तितकी अन्य कोणत्याही राजाला लाभली नाही.
४) जो धर्मकार्य करीत नाही त्याचे कोण पंडित स्तवन करील? या कलियुगात तुझ्याइतकी न्यायधर्म निरत असलेली अन्य कोणीही स्त्री ऐकिवात नाही.
५) हे देवी, तू नर्मदेला सोडून राहत नाहीस. कारण ती तुला अतिशय प्रिय आहे. आपण दोघीही पवित्र गंगेच्या सख्या आहात. कारण दोघींच्याही मनात सत्कार्य करण्याची इच्छा आहे.
६) हे विष्णुपद, अहिल्यादेवी ही तुझी परमभक्त आहे.सारे लोक तिची प्रशंसा करतात. हे ऐकून तुलाही आनंद वाटेल. सारे विश्व जिची स्तुती करते आहे.

दक्षिण भारतातील प्रसिद्ध विद्वान इतिहासतज्ज्ञ रावबहादूर चितामगो विनायक वैद्य यांनी अहिल्याबाईच्या संबंधी विविधज्ञान विस्तार या प्रसिद्ध अशा वर्तमानपत्रात लेख लिहिला होता. त्यात ते लिहितात, "ही लोकोत्तर स्त्री आपल्या वर्तमान गुणांनी महाराष्ट्रातच नव्हे तर, अखिल मानवजातीस भूषण झाली आहे. तिची बुद्धिमत्ता इतकी व्यापक होती की, त्या प्रत्येक कार्यात हुशार आणि जाणकार ठरत असत. त्यांची धर्मशीलता इतकी उदात्त होती की, धर्माच्या आणि नौतिकच्या प्रत्येक बाबतीत, त्यांनी आपले नाव अजरामर करून ठेवले. त्यांचा दानधर्म इतका प्रचंड की, तसा दानधर्म आजवर भारतात कुणी केला नाही. आपल्या राज्याखेरीज इतर राज्यातही प्रचंड वास्तू उभारणाऱ्या अहिल्याबाई याच एकमेव आहेत. त्यांचा न्याय इतका चोख असे की, उभय बाजू त्यांचं कौतुक गात असत. त्यांची लीनता इतकी विलक्षण होती की, त्या कोणासही आपली प्रशंसा, स्तुती करू देत नसत. त्यांची जरबही इतकी दांडगी होती की, त्यांच्या हुकुमाशिवाय कुणासही काही करण्याची हिंमत नव्हती. आपल्या समान दर्जाच्या सरदारांविषयी त्यांनी कधीच चढाओढ केली नाही. निर्मत्सर प्रेम केले. त्यांचे नेहेमी चांगलेच चितिले.

संस्कृत कवी खुशालीराम यांनी संस्कृतमध्ये अहिल्यादेवीविषयी लिहून ठेवले आहे. त्याचे हे मराठी भाषांतर इथे देत आहे. ते लिहितात, 'मल्हाररावांची ही पुत्रवधु विचारशीलता धर्मात्मा अहिल्याबाई खंडेरावांची धर्मपत्नी होती. त्या बहुत गुणवती होत्या. त्या नित्य धार्मिक कामात मग्न असत. त्या नेहेमी देवब्राह्मण आणि पुजाऱ्यांना दान देत. धर्मकार्यपरायण राहून कालक्रमणा करीत. त्यांनी कुरुक्षेत्रात सुवर्ण आणि चांदीचे तुलादानही केले. गुण, ज्ञान आणि शील यांनी संपन्न असणाऱ्या ब्राह्मणांना दाने दिली. त्यांनी देशोदेशी अनेक प्रकारे अन्नदान केले. याचकांच्या याचना पूर्ण केल्या. शरणागतांच्या इच्छा पूर्ण केल्या. हे सारे विचार खुशालीराम यांनी संस्कृतमध्ये लिहिलेले आहे. त्यांनी या काव्यात त्यांच्या धार्मिकतेबद्दल लिहिले आहे. परंतु त्यांची राजकीय आणि सामाजिक जाणही खूप मजबूत होती. किंबहुना त्यांची धार्मिकता सुद्धा समाजकारणाशीच जोडलेली होती ही त्यांची विशेषता होती.

कै.विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी अहिल्यादेवींच्या चरित्रात लिहिले आहे "त्यांच्या चरित्रात परस्परविरोधी म्हणून म्हणता येतील असे सर्व गुण होते. एक स्त्री असूनही छानछोकीने राहणे त्यांना कधी आवडले नाही. स्वधर्मावर अतिशय प्रेम असूनही, परधर्मी लोकांचा त्यांनी कधी अनादर, राग केला नाही. इतकेच नव्हे तर त्यांच्यावर कृपाच केली. भर तारुण्यात वैधव्य आले असतांनाही, त्यांनी पतिव्रत्याचे पूर्णपणे पालन केले. अफाट संपत्तीची स्वामिनी असूनही एखाद्या तपस्विनीप्रमाणे अत्यंत साधेपणाने त्यांनी जीवन कंठिले. अमर्याद विशाल राज्याची स्वामिनी असूनही त्याचे संचालन अतुलनीय चातुर्याने करत. त्यांच्या मनाला अहंकार कधी चुकूनही शिवला नाही. त्या देवभीरू होत्या. त्या स्वतः अत्यंत निर्मळ, शुद्ध अंतःकरणाच्या होत्या. अहिल्याबाईंनी इतरांच्या दोषांबद्दल त्यांची घृणा वा तिरस्कार केला नाही उलट त्यांना सुधारण्याचाच प्रयत्न केला. म्हणूनच अहिल्याबाई म्हणजे मनुष्यरुप धारण केलेली देवताच होती असे म्हणणे भाग आहे.

लोकांचं सुख हेच राजाचं सुख असतं, लोकांचं हित तेच राजाचं हित असतं, राजाचं हित स्वार्थ साधण्यात नसतं, तर ते प्रजेला सुखी करण्यात असतं. हा अहिल्याबाईंचा राजधर्म होता. म्हणूनच त्या लोकराज्ञी झाल्या.लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या नेतृत्वाखाली एक समृध्द,गौरवशाली, कल्याणकारी ज्याला शिवरायानंतरचा सुवर्णकाळ म्हणता येईल. असे एक लोकराज्य होते. होळकरांचे इंदोर स्टेट. लोकमाता अहिल्याबाई होळकर या मराठा इतिहासातील कर्तृत्ववान राज्यकर्त्या होत्या.संकटाच्या परिस्थितीत आलेली राजकीय जबाबदारी, शत्रुची चाल अशा परिस्थितीत न डगमगता पारदर्शक राज्यकारभार सांभाळुन प्रजेचे हित, वैराग्य भावना, अनेक कल्याणकारी कार्ये, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्ये यांची ओळख होणे गरजेचे आहे. एक राज्यकर्ता कसा असावा. व कल्याणकारी राज्य कशा प्रकारे असावे. यासाठी समाजाला त्यांचे विचार व कार्ये मार्गदर्शक ठरू शकतील.

**सारांश** – अहिल्याबाईंनी एका राज्याच्या प्रमुख राज्यकर्त्या म्हणून जी कार्ये केली.ती आजच्या लोकशाहीतील शासनासाठीही मार्गदर्शक ठरतील. राज्यकारभार, करत असतांना जनतेप्रती उत्तरदायित्व, आत्मीयतेची भावना, जबाबदार राज्यकारभार, कायदयाचे राज्य, निःपक्ष न्यायव्यवस्था, उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था, धाडसी निर्णयक्षमता सामान्य व दुर्बलांना न्याय अशा स्वरूपाची कल्याणकारी कार्ये केली आहेत. समकालीनांकडूनच नव्हे तर जदुनाथ सरकार, ॲनी बेझंट आणि जॉन के यांसारख्या नंतरच्या इतिहासकारांकडून आणि विचारवंतांकडूनही आदर मिळाला. अहिल्याबाई होळकर यांना प्रादेशिक स्तरावर जेवढा सन्मान मिळाला तेवढा राष्ट्रीय स्तरावर मिळाला नाही ही एक विडंबना आहे. जन्मजात लिंग पूर्वाग्रहामुळे पुरुषी समाज त्यांच्या उंचीच्या स्त्रीला कसे सहज विसरतो.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume III*

**संदर्भ –**

१. विजया जहागिरदार: **महाराष्ट्राचे शिल्पकार तेजस्विनी अहिल्याबाई होळकर**,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,जानेवारी २००३.
२. दत्तात्रय बळवंत पारसनिस,सुधारित आवृतीचे संपादक डॉ.देविदास पोटे:**महेश दरबाराची बातमी पत्रे,खंड पाच,**२०२१.
३. अदिति नारायणी पासवान ,**जेव्हा एका होळकर राणीने भारताला रामराज्य दिले**, इंडियन एक्यप्रेस स्तंभ लेख,३१ मे २०२४.
४. देवीदास पोटे: **" वेध अहिल्याबाईंचा"** परम मित्र पब्लिकेशन्स ,१ जानेवारी २०२२.
५. राज भास्कर : **लोकमाता अहल्याबाई होळकर,**नवभारत साहित्य मंदिर,२०२४.
६. राजेंद्र पांडे:**विरंगना अहिल्याबाई होळकर**,डायमंड बुक,२०२४.
७. विनयकुमार वासनिक:**अहिल्याबाई होळकर बायोग्राफी**,सुधिर प्रकाशन,वर्धा २०२४.
८. मुक्ता केणेकर:**लोकराज्ञी अहिल्याबाई होळकर**,सह्याद्री बुक डेपो.

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 